


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १३२, शुक्रवार २ फेब्रुवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# खादी ग्रामोद्योग संघाची निवडणूक बिनविरोध

## आ. नीलेश लंके यांच्या शिष्टाईला यश

पारनेर : प्रतिनिधी

**आमदार नीलेश लंके यांनी केलेल्या शिष्टाईला यश आल्याने पारनेर तालुका खादी ग्रामोद्योग संघाच्या व्यवस्थापक समिती सदस्य पदाची निवडणूक बिनविरोध पार पडली आहे.**

बुधवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी एकूण ३२ उमेवारी अर्ज होते. दिवसभरातील नाटयमय घडामोडीनंतर २१ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने ही निवडणूक बिनविरोध झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी टी.एस.भोसले यांनी सांगितले.

ग्रामीण क्षेत्रातील गरजू लोकांना रोजगार खेडया पाडयातील कारागिर व बलुतेदार यांच्या उद्योगाचे स्थैर्य, स्वयंरोजगाराची व्यापक संधी ग्रामोद्योगासाठी पतपुरवठा आदींसाठी कार्यरत असलेल्या पारनेर तालुका खादी ग्रामोद्योग संघावर विद्यामान चेअरमन हसन राजे यांचे अनेक वर्षांपासून वर्चस्व आहे. या संघाची निवडूक प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच आ. नीलेश लंके यांनी या निवडणूकीचे सर्वाधिकार हसन राजे यांच्याकडे दिले होते. निवडणूक जाहिर झाल्यानंतर विविध मतदारसंघात अर्ज दाखल झाल्यानंतर बिनविरोध निवड करण्यासाठी आ. नीलेश लंके यांनी पुढाकार घेतला. इच्छुक उमेदवारांशी त्यांनी बुधवारी चर्चा करून सर्वसमावेशक ११ नावांवर एकमत करण्यात आले.

बुधवारी दिवसभर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. बाळासाहेब कावरे, रा. या. औटी, माजी उपसरपंच विजय डोळ, बाळासाहेब नगरे, योगेश मते, डॉ. सादीक राजे, बंडू गायकवाड, श्रीकांत चौरे, संतोष रोहोकले यांनी निवडणूक बिनविरोध करण्यासाठी परिश्रम घेतले.

### यांनी घेतली माघार

अन्सार सय्यद, संजय भगत, अंबादास जाधव, सतिष म्हस्के, सुनील गाडगे, अविनाश देशमुख, देविदास आबूज, शब्बीरभाई इनामदार, बाळासाहेब कावरे, किरण कुबडे, श्रीकांत चौरे, वैभव गायकवाड, संतोष रोहोकले, रमीजा शेख, रेखा गोरे, आयुब शेख.



पारनेर तालुका खादी ग्रामोद्योग संघाची निवडणूक पक्रिया बिनविरोध पार पडल्यानंतर आमदार नीलेश लंके यांनी हसन राजे व इतर सदस्यांचा सत्कार केला.

### बिनविरोध सदस्य

सर्वसाधारण प्रतिनिधी : हसन अमिर राजे, राजेंद्र शंकर करंदीकर, अण्णा भाऊसाहेब खैरे, नीलेश खंडू खोडदे, अमित हरिभाऊ जाधव, भाऊसाहेब रामभाऊ रासकर.

अनुसुचित जाती, जमाती प्रतिनिधी : ईश्वर धर्माजी पठारे, महिला प्रतिनिधी : सारिका अविनाश देशमुख, शोभा उत्तम शेलार

इतर मागासर्गीय प्रतिनिधी : ऋषिकेश जगन्नाथ बोरूडे, भटक्या विमुक्त जाती, जमाती, विशेष मागासवर्गीय प्रतिनिधी : राजू दत्तात्रेय पांढरे

### सकारात्मक संदेश

या संस्थेची निवडणूक बिनविरोध करावी ही आ. नीलेश लंके यांची सुरूवातीपासून भूमिका होती. या संस्थेच्या निवड प्रक्रियेत आपण हस्तक्षेप करणार नाही असेही त्यांनी स्पष्ट केले होते. अर्ज दाखल झाल्यानंतर आ. लंके यांनी शिष्टाई करीत निवडणूक बिनविरोध करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावल्याने एक सकारात्मक संदेश दिला गेला आहे.

हसन राजे
अध्यक्ष, खादी ग्रामोद्योग संघ

### संस्थेच्या हिताचा निर्णय

निवडणूक प्रक्रिया राबवून संस्थेचा खर्च वाया घालण्यापेक्षा बिनविरोध निवडणूक करण्याची आ. नीलेश लंके यांची सुरूवातीपासूनची भूमिका घेतली होती. अर्ज दाखल केलेल्या इतर उमेदवारांशी त्यांनी चर्चा करून सर्वसमावेशक व्यवस्थापक समिती सदस्यांची निवड करण्यात आली. आ. लंके यांनी घेतलेला निर्णय संस्थेच्या हिताचा आहे.

अर्जुन भालेकर
जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

# कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांसाठी १३ कोटींचा निधी

## आ. नीलेश लंके यांची माहिती

पारनेर : प्रतिनिधी



**कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधण्यासाठी पारनेर-नगर मतदार संघातील ११ गावांसाठी १२ कोटी ९२ लाख १६ हजार ४६८ रूपयांचा निधी मंजुर करण्यात आल्याची माहिती आमदार नीलेश लंके यांनी दिली.**

छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक सु.पा.कुशिरे यांनी ० ते १००हेक्टर सिंचन क्षमतेच्या नगर जिल्हयातील पारनेर व नगर तालुक्यातील कोल्हापूर पध्दतीच्या ११ योजनांना प्रशासकिय मंजुरी दिली आहे. प्रशासकिय मान्यता अंदाजपत्रकाप्रमाणे या योजनांची एकूण साठवण क्षमता ७३७.७३ स. घ. मी असून नियोजित सिंचन क्षमता २५४ हेक्टर इतकी आहे.

आ. लंके म्हणाले, विविध विकास कामांसाठी कोटयावधींचा निधी मंजुर करण्याबरोबरच सिंचनाकडेही आपले लक्ष असून सिंचन क्षमता वाढवून शेतकरी वर्गाला समृध्द करण्याचा आपला प्रयत्न आहे. यापुढील काळातही सिंचन योजनांसाठी निधी खेचून आणण्यासाठी आपण प्रयत्नशिल आहोत.


**बंधारे मंजुर झालेली गावे व त्यासाठी मंजुर निधी पुढीलप्रमाणे**

वडनेर बुद्रुक बाबर मळा १ कोटी ६२ लाख ५० हजार ५२३, रूईछत्रपती वाबळे वस्ती १ कोटी २३ लाख ९ हजार ५६४,गटेवाडी हडकी दरा १ कोटी ४६ लाख ८६ हजार ३८ रांधे कॅनॉलजवळ १ कोटी ३० लाख ८२ हजार ९६५, पिंपळगांव कौडा ता. नगर स्मशानभुमीजवळ १ कोटी ६ लाख ५ हजार ९६३, खडकी, ता. नगर स्मशानभुमीजवळ ९० लाख ४३ हजार ६०९, भोरवाडी ता. नगर भिरभिरा कोपरा १ कोटी ११ लाख ३ हजार ९६५, कामरगांव ता. नगर शाहू डोह १ कोटी १२ लाख ६२ हजार ११२, बाबुर्डी काकडे मळा १ कोटी लाख ७३ हजार ३३३, दैठणे गुंजाळ भाळवणी रस्ता ८४ लाख ४८ हजार ४९६, पिंपळनेर वडूले वस्ती १ कोटी २ लाख ४९ हजार ९२७

# शिरुर रांजणगांव पोलीस ठाण्याला नवे कारभारी !

## ■ शिरुरला ज्योतिराम गुंजवटे यांची नियुक्ती ■ रांजणगांवला महादेव वाघमोडे यांची नियुक्ती

शिरुर : प्रतिनिधी




**लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिरुरचे पोलीस निरीक्षक संजय जगताप आणि रांजणगांव एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश ढवाण यांची आठ दिवसांपूर्वी बदली झाल्याने त्यांच्याजागी कोण येणार याबाबत उत्सुकता होती. ही उत्सुकता आता संपुष्टात आली असून शिरुर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक पदी ज्योतिराम गुंजवटे व रांजणगावच्या पोलीस निरीक्षक पदी महादेव वाघमोडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या राज्यातील पोलीस दलामध्ये बदल्यांचे सत्र सुरू आहे. त्यानुसार, शिरूरच्या पोलीस निरीक्षक पदी ज्योतीराम गुंजवटे यांची नियुक्ती करण्यात उर्वरीत पान ३ वर

# पतीच्या पाठोपाठ पत्नीचे चौथ्या दिवशी निधन

## ■ दोघांनाही हृदयविकाराचा तीव्र झटका ■ भाळवणी येथील दुर्दैवी घटना

भाळवणी : प्रतिनिधी



**भाळवणी येथील सेवानिवृत्त वायरमन संभाजी बबनराव रोहोकले यांचे सोमवारी (दि.३१ जानेवारी) हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाल्यानंतर त्यांच्या पाठोपाठ आज गुरुवारी चौथ्याच दिवशी त्यांच्या पत्नी मंजुळाबाई संभाजी रोहोकले यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाल्याने भाळवणीत हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.**

महावितरण कंपनीत भाळवणी परिसरात सेवा करून सेवानिवृत्त झालेले संभाजी रोहोकले यांचे सोमवारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.जनमानसात संभा वायरमन तर परिवारात बापू या नावाने ते प्रचलित होते. त्यांच्या निधनाला अवघे चार दिवस होताच हा धक्का सहन न झाल्याने त्यांच्या पत्नी मंजुळाबाई रोहोकले यांनाही आज गुरुवारी सकाळच्या सुमारास हृदयविकाराचा तीव्र झटका आला.उपचारासाठी नगर येथील रुग्णालयात नेत असतानाच रस्त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली.

पतीच्या निधनापाठोपाठ अवघ्या चारच दिवसात जगाचा निरोप घेणाऱ्या पत्नीच्या निधनाबद्दल भाळवणी व परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे.बापूंच्या पाठोपाठ नानींचे जाणेही सर्वांनाच हूरहूर लावून गेले आहे.शोकाकुल वातावरणात भाळवणी येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. चारच दिवसात पती पाठोपाठ पत्नीचे जाणे ही या परिसरातील एकमेव घटना आहे. त्यांच्या पश्चात मुलगा सुभाष, रोहिदास, सुना नातवंडे असा परिवार आहे.


# तिघा हद्दपार गुन्हेगारांचे पारनेर तालुक्यात वास्तव्य!

## ■ स्थानिक गुन्हे शाखेने केले तिघांनाही जेरबंद ■ सोनई येथूनही एकास घेतले ताब्यात

नगर : प्रतिनिधी

**नगर जिल्हयातून हद्दपार करण्यात आलेले परंतू लपून छपून पारनेर तालुक्यात वास्तव्य करणा-या तिघा गुन्हेगारांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मुसक्या आवळल्या आहेत.**

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना मिळालेल्या गुप्त माहीतीनुसार सुपा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हद्दपार गुन्हेगार संजय बबन शेलार वय ३९ रा. पाडळी रांजणगांव ता. पारनेर, अजय विजय लोंढे वय ३२ रा. कानिफनाथ गल्ली हंगा, ता. पारनेर हे लपुन छपून तालुक्यात वास्तव्य करीत आहेत. आहेर यांनी या गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी पथकाची नेमणूक केल्यानंतर पथकाने हद्दपार गुन्हेगारांचा शोध घेतला असता दोघेही पारनेर तालुक्याच्या हद्दीमध्ये आढळून आले. दोघांनाही ताब्यात घेण्यात येऊन त्यांच्या विरोधात सुपा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.



पथक पारनेर तालुक्यात हद्दपार गुन्हेगारांचा शोध घेत असताना गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहीतीनुसार सोनई ता. नेवासे येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गुन्हेगार अमोल अशोक गडाख रा. सोनई हा देखील पारनेर तालुक्यात वास्तव्यास होता. पथकास त्याबाबत माहीती देण्यात आल्यानंतर अमोल गडाख याचा शोध घेण्यात येऊन त्यालाही ताब्यात घेण्यात आले. त्याच्याविरोधात सोनई पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेस जिल्हयातून हद्दपार करण्यात आलेले, रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांचा शोध घेऊन हद्दपार आदेशाचा भंग करून नगर जिल्हयात बेकायदेशिररित्या वास्तव्य करताना आढळून आल्यास कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशान्वये ही कारवाई करण्यात आली.

हद्दपार गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या पथकामध्ये सहा पोलीस निरीक्षक हेमंत थोरात, सहा. फौजदार भाऊसाहेब काळे, बापुसाहेब फोलाणे, अतुल लोटके, विशाल दळवी, ज्ञानेश्वर शिंदे, गणेश भिंगारदिवे, रविंद्र पांडे, सुरेश माळी, रविंद्र कर्डीले, भिमराज खर्से, जालिंदर माने, उमाकांत गावडे यांचा समावेश होता.

# नारायणगव्हाणकरांनी रोखला नगर-पुणे महामार्ग

## ■ महामार्गाच्या चौपदरीकरणाकडे दुर्लक्ष ■ पोलीस निरीक्षक अरूण आव्हाड यांच्या मध्यस्तीनंतर आंदोलन मागे



(छाया : शरद रसाळ)

सुपा : प्रतिनिधी

**नगर-पुणे महामार्गावरील नारायणगव्हाण येथील रस्त्याचे चौपदरीकरण करण्याच्या मागणीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या दुर्लक्षाच्या निषेधार्थ ग्रामस्थांनी महिन्याच्या पहिल्याच दिवशी गुरूवारी नगर-पुणे महामार्गावरील वाहतूक रोखत चक्का जाम आंदोलन केले. सुपा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरूण आव्हाड यांच्या मध्यस्तीनंतर आंदोलन मागे घेण्यात आले.**

नगर-पुणे महामार्गाचे चौपदरीकरण झाल्यापासून नारायणगव्हाण गावातून जाणारा रस्ता मात्र दुपदरीच आहे. वाढत्या वाहतूकीमुळे या परिसरात अपघातांची मालीका सुरूच असून ग्रामस्थांनी जीव मुठीत धरून या रस्त्यावरून प्रवास करावा लागत आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठीही हा रस्ता धोक्याचा आहे. या रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी सबंधित अधिकाऱ्यांना वेळोवेळी निवेदने देऊन आंदोलने करूनही या मागणीकडे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांमध्ये प्रचंड नाराजी आहे.

ग्रामस्थ सकाळी रस्त्यावर उतरल्यानंतर सुपा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरूण आव्हाड यांनी पुढाकार घेत मध्यस्ती करण्याचा प्रयत्न केला. मात्र आक्रमक गावकरी रस्त्यावरून हटण्यास तयार नव्हते. आव्हाड यांनी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करून अधिकाऱ्यांसमवेत ग्रामपंचायत कार्यालयात बैठकीचे आयोजन केले. त्यानंतर आव्हाड यांच्या मध्यस्तीनंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

उपविभागीय अधिकारी संजय भावसार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता, मंडलाधिकारी बी. जी. पवार, तलाठी शिरसाठ, ग्रामविकास अधिकारी गायकवाड यांच्यासमवेत पोलीस निरीक्षक अरूण आव्हाड, आंदोलक सचिन शेळके, शरद पवळे, सरपंच मनिषा जाधव, विलास खोले, दादासाहेब शेळके, अर्जुन वाल्हेकर, शिवाजी नवले, हुसेन शेख, किसन शेळके, विजय चव्हाण, बाळकृष्ण शेळके, मिलिंद शेळके आदींनी चर्चेत भाग घेतला.

यावेळी दगडू हारदे, शिवाजी शेळके, काशिनाथ कांडेकर, धोंडीबा गायकवाड, भिमा जाधव, अप्पा शेळके, भिमबाई कांडेकर, बाळासाहेब काकडे, भाऊसाहेब नाईक, लहानू शेळके, सुनील शेळके, विकास पवार, बबन पवार, बबन नवले, नितिन जाधव, अनिल शेळके यांच्यासह ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

### भुमी अभिलेखचा तिढा

यावेळी भुमि अभिलेखचा अधिकारी अथवा कर्मचारी उपस्थित नसल्याने तिढा निर्माण झाला होता. भुमि अभिलेख कार्यालयाकडे मोजणी फी जमा करण्यात येउनही नकाशा उपलब्ध होत नसल्याची तक्रार उपविभागिय अभियंता यांनी केली. यावेळी मंडलाधिकारी, तलाठी यांना आंदोलकांनी धारेवर धरत भुमी अभिलेखला आंदोलनाची कल्पना का दिली नाही अशी विचारणा करीत धारेवर धरले.

### १६ फेब्रुवारी रोजी बैठक

भुमी अभिलेख कार्यालयामुळे तिढा निर्माण झाल्यानंतर तलाठी शिरसाठी यांनी तहसिलदार गायत्री सैंदाणे यांच्याशी संपर्क करून चर्चा केली असता येत्या १६ फेब्रुवारी रोजी सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत पारनेर येथे बैठक आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले. १६ फेब्रुवारी रोजी या प्रश्नावर निर्णय न झाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा आंदोलक सचिन शेळके यांनी दिला.



# प्रगतीमंत्र





## फोनवरून मुलाखत देताय?

**फोनवरून मुलाखत देणं, अजिबात सोपं नाही. प्रत्यक्ष मुलाखत देण्यापेक्षाही फोनवर उत्तरं देणं आणि पलीकडच्याला प्रभावित करणं जास्त कठीण आहे. त्यामुळे त्याची जास्त तयारी करायला हवी.**

अमोल गेले काही महिने नोकरी शोधतो आहे. काही ठिकाणी त्याला मुलाखतीचे कॉल आले; पण त्याची गाडी काही पुढे सरकत नाही. त्याच्या मते, जेव्हा त्याची फोनवर मुलाखत होते, तेव्हा त्याचा आत्मविश्वास कमी होतो. बोलताना काही तरी चुका होतात आणि त्याची निवड होत नाही... प्रत्यक्ष मुलाखतीपेक्षा टेलिफोनिक मुलाखत सोपी आहे, असं वाटत असेल तर तो मोठा गैरसमज आहे. खरं तर समोर बसून उत्तरं देण्यापेक्षाही टेलिफोनवर उत्तरं देणं आणि पलीकडच्याला प्रभावित करणं जास्त कठीण आहे; कारण तिकडून बोलणाऱ्याला तुमचा चेहरा, देहबोली काहीही दिसत नसते आणि टेलिफोनवरचे इम्प्रेशन हे केवळ तुमच्या उत्तरांवर अवलंबून असतं. आजकाल अनेक कंपन्या टेलिफोनिक इंटरव्ह्यूचा वापर करत आहेत. या पहिल्या फेरीमध्ये जर तुमची कामगिरी चांगली झाली नाही, तर पुढच्या फेरीत तुमची निवड होण्याची शक्यता नसते; पण तरीही बहुतेक उमेदवार टेलिफोनिक मुलाखतीला हवं तितकं महत्त्व देत नाहीत. या महत्त्वाच्या फेरीची तयारी करताना काय केलं पाहिजे आणि त्याला यशस्वीरीत्या सामोरे कसं जावं, हे माहीत असणं जरुरीचं आहे.

### शांत जागेची निवड

**इंटरव्ह्यू देताना घरातील शांत कोपरा निवडा. जेथे कुठल्याही इतर आवाजाचा व्यत्यय येणार नाही. टीव्ही, रेडिओ बंद ठेवा; कारण समोरचा काय बोलतो आहे, हे नीट ऐकू आलं नाही तर त्याला उत्तर देणंही कठीण जाईल. तसंच मोबाइल फोनवर बोलत असाल तर बोलताना कॉल मध्येच ड्रॉप होऊ नये म्हणून निवडलेल्या जागी नेटवर्क व्यवस्थित आहे, याची खात्री करून घ्या.**

### हात मोकळे ठेवा

तुम्ही इंजिनीअर किंवा आयटीमधील असाल आणि एखादा प्रॉब्लेम, केस स्टडी सोडवायला दिला तर हातात फोन असेल, तर वेळ जातो. अशा वेळी हात मोकळे असणं महत्त्वाचं असतं. त्यामुळे स्पीकर फोनवर किंवा ब्ल्यू टूथवर बोला.

### लक्ष देऊन ऐका

अर्थात हात मोकळे असले तरी आजूबाजूला असलेल्या पेनशी खेळू नका; कारण त्याने लक्ष विचलित होतं आणि समोरच्याने काय प्रश्न विचारला आहे, हे पटकन कळत नाही. त्याचप्रमाणे इंटरव्ह्यू घेणाऱ्याचं बोलणं मध्येच तोडू नका. त्यांचा प्रश्न पूर्ण झाल्यावर मगच तुमचं म्हणणं मांडायला सुरुवात करा.

### तयारी करा

सीव्ही तुमचाच असला तरीही त्याचा नीट अभ्यास करा; कारण जर तुमच्या सीव्हीमधील एखाद्या मुद्द्यावर प्रश्न विचारला गेला आणि त्याबद्दल तुम्हाला पटकन आठवले नाही तर त्याचा उलटा परिणाम होतो. तुमची खास कौशल्यं, तुम्ही कशात कमी आहात, हे वेगळं लिहून ठेवा. त्याचप्रमाणे कंपनीबाबतही पूर्ण माहिती घ्या; कारण त्यामुळे तुमचा प्रभाव पडू शकतो. इंटरव्ह्यू सुरू होताना समोरच्याचं नाव आणि हुद्दा याची माहिती घ्या, म्हणजे बोलत असताना त्या व्यक्तीचं नाव घेऊन त्यांच्याशी बोलता येतं. तसंच जवळ कोरा कागद, पेन, ठेवा. इंटरव्ह्यू टेलिफोनिक असला, तरीही एखाद्या प्रत्यक्ष इंटरव्ह्यूला जाताना तयारी कराल, तसे कपडे घाला. घरातील कपड्यांवर बसण्याऐवजी चांगले कपडे घाला; कारण त्यामुळे एक प्रकारचं प्रोफेशनल फीलिंग येतं आणि त्याचा बोलण्यावर चांगला परिणाम होतो.

### शांतपणे अन् स्पष्ट बोला

बोलताना हसून बोला; कारण ते तुमच्या आवाजातून दिसून येतं; तसंच खूप भराभर न बोलता शांतपणे आपलं म्हणणं मांडा, म्हणजे समोरच्याला ते नीट कळू शकेल. उत्तर देताना खूप लांबण लावू नका. थोडक्यात आणि स्पष्ट उत्तरे द्या; तसंच प्रश्न ऐकल्यावर गडबडीने उत्तराला सुरुवात न करता वेळ घेऊन स्वतःचे विचार एकत्र करून उत्तर द्या. त्याचा सकारात्मक परिणाम समोरच्यावर होते. इथे केवळ तुमचा आवाज हेच इम्प्रेस करण्याचे साधन असतं, हे विसरू नका. खोटी माहिती देऊ नका आणि वेगळेपणाचा आवही आणू नका. समोरची व्यक्ती प्रोफेशनल आहे, हे विसरू नका.

### आत्मविश्वास



समोरच्याला तुम्ही दिसत नाही म्हणून नर्व्हस होऊ नका; कारण ते तुमच्या आवाजात ऐकू येतं. आत्मविश्वास असेल, तर तो आवाजातूनही दिसून येतो. एखाद्या प्रश्नाचं उत्तर द्यायला वेळ हवा असेल, तर ते समोरच्याला सांगा; कारण फोनवरची मधली शांतता अवघडलेली असते. तुम्हाला प्रश्न कळला आहे ना, फोन मध्येच कट झाला का, असं इंटरव्ह्यू घेणाऱ्याला वाटू शकतं. बोलताना आवाजाची पातळी मध्यम ठेवा, उगाचच ओरडून वा हळूवार आवाजात बोलण्याचं टाळा. टेलिफोनिक इंटरव्ह्यू संपल्यावर समोरच्याचे आभार माना आणि या पुढची पायरी काय आहे किंवा कंपनी पॉलिसी काय आहे, याची माहिती विचारून घ्या. त्यातून तुम्हाला नोकरीबद्दल कुतुहल आहे, असं दिसून येईल.

## ॲप्टिट्यूड टेस्ट म्हणजे काय?

**दहावी–बारावीच्या परीक्षा संपल्या की कोणत्या शिक्षण मार्गावर जायचं, असा प्रश्न निर्माण होतो. यासाठी ॲप्टिट्यूड टेस्ट आणि करिअर कौन्सेलरची मदत घेतली जाते. करिअर निवडण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या या मानसशास्त्रीय चाचणीबद्दल...**

ॲप्टिट्यूड टेस्टमध्ये घेतल्या जाणाऱ्या मानसशास्त्रीय चाचण्यांच्या निष्कर्षांवर अनेकदा प्रश्न उपस्थित होतात. म्हणूनच त्यांचं स्वरूप मुळापासून समजावून घेणं महत्वाचं आहे. त्यामुळे विद्यार्थी व पालकांच्या मनातील संभ्रम कमी होईल. या मानसशास्त्रीय चाचण्यांमध्ये चार विभाग पडतात. यामध्ये अभिरूची (इंटरेस्ट) चाचणी, बुध्दिमापन (इंटेलिजन्स) चाचणी, अभिक्षमता (ॲप्टिटयूड) चाचणी व व्यक्तिमत्त्व (पर्सनॅलिटी) चाचणी आदींचा समावेश होतो.

### अभिक्षमता चाचणी

विविध व्यवसायांना लागणाऱ्या क्षमतांनुसार या चाचण्या तयार केलेल्या असतात. या चाचणीद्वारे विद्यार्थी कोणत्या व्यवसायात अधिक यशस्वी होईल, हे सूचित केले जाते. क्लिनिकल सायकोलॉजिस्टकडून यासाठी डिफरन्शियल ॲप्टिट्युड टेस्ट वापरली जाते, तर राज्य सरकारच्या व्यवसाय निवड व प्रशिक्षण मंडळातून प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांकडून नाफडे यांची जनरल ॲप्टिट्यूड टेस्ट बॅटरीही वापरण्यात येते. नाफडे यांनी भारतीय मानकांनुसार या टेस्टची रचना केली आहे. त्यामुळे ही टेस्ट अधिक लोकप्रिय आहे.

### कोणत्या चाचण्या होतात?

- नेम कंपॅरिझन : या चाचणीद्वारे क्लेरिकल कामासाठीचा वेग व अचूकता मोजण्याचं काम केलं जातं.
- ॲरिथमॅटिक कॉम्प्युटेशन : जलद व अचूक आकडेमोड करण्याचं कसब. यामध्ये आजमावलं जातं.
- थ्री डायमेन्शनल स्पेस – यामध्ये आर्किटेक्चर, फॅशन डिझाईन, इंटिरियर डिझाईन, फाईन आर्टसारख्या सृजनशील क्षेत्रात लागणारी अवकाशीय क्षमता जोखण्याचं काम केलं जातं.
- टुल मॅचिंग : यामधून विद्यार्थ्यांची तांत्रिक व यांत्रिकी क्षमता तपासण्याचं काम केलं जातं. यामधून एकाग्रता व निरीक्षण क्षमतेचाही अंदाज येतो.
- ॲरिथमॅटिस रिझनिंग : गणितीय संकल्पनांबाबत यामधून अंदाज घेता येतो. अभियांत्रिकी वा विज्ञान संशोधन या क्षेत्र निवडीसाठी या चाचणीचा उपयोग होतो.
- फॉर्म मॅचिंग : विविध आकार, त्यांची जोडणी यासंबंधीचे परीक्षण या चाचणीद्वारे केले जाते. वैद्यकीय वा सृजनशील क्षेत्राच्या निवडीसाठी या चाचणीचा उपयोग होतो.
- नॉन व्हर्बल रिझनिंग : तर्कशुध्द विचार करण्याची क्षमता या चाचणीद्वारे जोखली जाते.
- व्होकॅबलरी इन मराठी अथवा इंग्रजी – भाषिक क्षमता तपासण्याचं काम या चाचणीद्वारे केले जाते. या चाचण्यांवरुन विद्यार्थी नेमका कुठल्या क्षेत्रात करिअर करू शकेल, हे ओळखलं जातं.

### क्षेत्र निश्चितीनंतर...

क्षेत्र निश्चितीनंतर त्या विद्यार्थ्यांच्या बुध्दिमत्तेनुसार अभ्यासक्रम निवडला पाहिजे. उदा. मॅकेनिकल क्षमता आहे, परंतु बुध्दिमत्ता कमी असेल तर अभियांत्रिकीचा पर्याय निवडण्यापेक्षा आय.टी.आय. वा अन्य अल्पमुदतीचा तांत्रिक अभ्यासक्रम निवडणे योग्य राहील.

### अभिरुची चाचणी

विद्यार्थ्यांना कोणत्या व्यवसायाबाबत आवड आहे, हे यामधून जोखलं जातं. या व्यवसायांसंबंधित प्रश्न या चाचणीमध्ये असतात. अनेकदा विद्यार्थ्यांची आवड कालानुरूप बदलत जाते. काही क्षेत्रांबाबत त्यांना माहिती नसते, अशा वेळेस त्याविषयी आवड असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे या चाचणीद्वारे चाचणीच्या वेळच्या अभिरुचीचा अंदाज येऊ शकतो.



### इंटेलिजन्स टेस्ट

एखाद्याची बुद्धिमत्ता मोजणं हे अवघड व सापेक्ष काम आहे. स्वतःच्या अनुभवातून शिकण्याची, ज्ञान मिळवण्याची क्षमता आणि नवीन परिस्थिती स्वीकारताना आपलं ज्ञान, संसाधनं (रिसोर्सेस) वापरण्याची क्षमता वा प्रश्न सोडवण्याची क्षमता, अशी बुद्धिमत्तेची व्याख्या केली गेली आहे. बुद्धिमत्ता मोजण्यासाठी ज्या चाचण्या वापरल्या जातात. त्याची स्वीकारार्हता, विश्वसनीयता महत्वाची आहे. साधारणत: या चाचण्या विशिष्ट समुदाय समोर ठेवून केलेल्या असतात. यामध्ये त्यांचा सामाजिक स्तर, वय, त्यांचं अनुभव विश्व (एक्सपोजर) याचा विचार केलेला असतो. या चाचण्या वैश्विक होऊ शकत नाहीत. एकाच चाचणीचा शहरी भागातील, ग्रामीण भागातील व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचा निकाल वेगवेगळा येईल. त्यामुळे एखादी विशिष्ट पार्श्वभूमी लक्षात घेऊन केलेल्या बुद्धिमत्ता चाचणीद्वारे विविध समाजघटकातील विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता मोजणं चुकीचं आहे. अनेकदा प्रश्नांची भाषा न समजल्यामुळेसुद्धा निकालांत फेरफार होतात. बुध्दिमापन चाचणीद्वारे अनेकदा ॲकेडेमिक बुद्धिमत्ता अधिक योग्य पध्दतीने जोखली जाते. आधुनिक मानसशास्त्रज्ञांनी बुध्दिमत्तांचेदेखील १२० प्रकार असल्याचे संशाधनात म्हटलं आहे. या सर्व प्रकारच्या बुध्दिमत्तांना एकाच चाचणीद्वारे मोजणं अशक्य आहे. संगीतातील बुध्दिमत्ता, खेळातील बुध्दिमत्ता याबाबत नेहमीच्या चाचण्या अपूर्ण आहेत.



### व्यक्तिमत्त्व चाचणी

व्यवसाय निवडीच्या दृष्टीने ही एक महत्त्वपूर्ण चाचणी आहे. व्यवसायाच्या जीवनपध्दतीशी आपला स्वभाव जुळतोय की नाही, हे यातून पाहता येते. काही व्यवसायांमध्ये बुद्धिमत्तेबरोबरीनेच व्यक्तिमत्त्वाचे अन्य पैलूदेखील महत्वपूर्ण ठरतात. उदा. सी.ए. म्हणून स्वतःचा व्यवसाय वाढवायला असेल तर अकांउंटिंगबरोबरीने जनसंपर्कही साधायला जमलं पाहिजे. अंतर्मुख (इंट्रोव्हर्ट) असणाऱ्यांनी शक्यतो एकट्याने काम करण्याची आवश्यकता असणाऱ्या क्षेत्रात करिअर केलं पाहिजे. (उदा. विश्लेषण, संशोधन, कॉम्प्युटर प्रोग्रेमिंग, कला वगैरे). या व्यक्तींनी मार्केटिंग वा जनसंपर्क यासारख्या क्षेत्रात जाऊ नये. बहिर्मुख (एक्सट्रोव्हर्ट) माणसांसाठी ही क्षेत्रं उत्तम आहेत. हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात (एव्हिएशन, हॉटेल उद्योग व ट्रॅव्हल टुरिझम) आकर्षक दिसण्याच्या बरोबरीनेच आदरातिथ्य, नम्रपणा, विपरित परिस्थितीत डोके शांत ठेवण्याची कला हे गुण अत्यावश्यक आहेत. यासाठीच करिअर निवडताना त्या करिअरमध्ये काय काम करणं अपेक्षित आहे व ते आपल्या स्वभावाशी जुळते आहे काय, याचा विचार करणं आवश्यक आहे. या दृष्टीने विचार करण्यासाठी व्यक्तिमत्त्व चाचणी उपयोगी पडते.

### ॲप्टिट्यूड टेस्ट करताना घ्यायची काळजी...

चाचण्या झाल्यावर पालक व विद्यार्थ्यांसोबत काऊन्सिलिंग झालं पाहिजे. या चाचण्या प्रशिक्षित समुपदेशकांकडून करुन घेणं योग्य राहील. एम.ए. (क्लिनिकल सायकोलॉजी) किंवा महाराष्ट्र सरकारच्या एक वर्षांच्या करिअर काऊन्सिलिंगचा कोर्स पूर्ण केलेले शिक्षक यासाठी पात्र असतात. समुपदेशकांना विविध करिअर्सची, अभ्यासक्रमांची अद्ययावत माहिती असावी लागते. विविध खासगी व्यावसायिक अभ्यासक्रम चालवणाऱ्या संस्थादेखील मोफत ॲप्टिट्यूड टेस्ट करून घेत असल्याची जाहिरात करतात. हा मार्केटिंग स्ट्रॅटेजीचा भाग असू शकतो. त्याला बळी पडू नये. योग्य ती माहिती घेऊन मगच या टेस्ट करून घ्याव्यात.



### इंटेलिजन्स टेस्ट

अनेकदा आपण पाहतो की, शालेय जीवनात हुशार गणले गेलेले विद्यार्थी प्रत्यक्षात तितकेसे पुढे आलेले दिसत नाहीत. जे अभ्यासात कधीही हुशार गणले गेले नाहीत, असे विद्यार्थी आयुष्यात अत्यंत यशस्वी झालेले आढळतात. याचे कारण त्यांच्या इमोशनल इंटेलिजन्समध्ये आहे. त्यांच्यात स्वतःच्या भावना ओळखण्याचं व त्यावर नियंत्रण ठेवण्याचं कौशल्य असतं, स्वतःला सातत्याने प्रेरित करत राहणं, दुसऱ्याच्या भावना समजून घेणं आणि समाजमनाचा कौल ओळखणं यांना अचूक कळतं. इमोशनल इंटेलिजन्समध्ये राग, भावनावशता, चिंता, अस्वस्थता आदींवर भावनांवर नियंत्रण मिळवणं महत्वाचं आहे. इतरांच्या भावना जाणून घेण्याची कला, दुसऱ्याप्रती संवेदनशीलता, निराशेतही चिकाटीने प्रयत्न करत राहणं, स्वतःला सातत्याने प्रेरित करत राहणं हे इमोशनली इंटेलिजंट व्यक्तीचं लक्षण आहे. त्यामुळे जीवनात यशस्वी होण्यासाठी इमोशनल इंटेलिजन्सही महत्त्वाचा आहे. करिअर निवडताना अभिरूची, अभिक्षमता, व्यक्तिमत्त्व, बुद्धिमत्ता व इमोशनल इंटेलिजन्स या सर्व घटकांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे. या सर्व चाचण्यांचा निकाल तपासताना व्यक्तिपरत्वे येणाऱ्या भिन्नतेचा विचार समुपदेशकाने करणं आवश्यक आहे. त्यांच्या प्रमाणाबाबत सजगता बाळगायला हवी. या चाचण्यांमधून केवळ एकच क्षेत्र सुचवले जाईल, अशी अपेक्षा धरणंही चुकीचं आहे. कारण काही विद्यार्थ्यांची एकापेक्षा अधिक विषयांमध्ये गती असू शकेल. त्यामुळे अनेक क्षेत्र त्यापुढे खुली असतील.

## इंटिरिअर डिझायनिंगमध्ये संधी नक्की कुठे?

**आज प्रत्येक व्यक्तीला आपलं घर, आपलं ऑफिस छान दिसावं, वापरायलाही सोपं आणि मोकळं असावं असं वाटत आहे. त्यामुळेच इंटिरिअर डिझायनर्सची मागणी वाढलेली दिसते.**



इंटिरिअर डिझायनर्सचं प्रमुख आणि मुलभूत काम म्हणजे उपलब्ध असणाऱ्या जागेचं योग्य प्रकारे नियोजन करून ती जागा सुशोभित करणं. या उपलब्ध जागेचा जास्तीत जास्त वापर करून घेण्याची प्राथमिक जबाबदारी इंटिरिअर डिझायनरवर असते. जागेचा सुयोग्य वापर करून घर, ऑफिस सजवणं, लाइट्स (प्रकाशयोजना), सजावटीच्या वस्तू, फर्निचर, घराची, ऑफिसची रंगसंगती, आकर्षक सजावट, पडदे आणि सोफ्याचे कापड निवडणं अशी अनेक कामे इंटिरिअर डिझायनरना करावी लागतात.

### शैक्षणिक संधी

खासगी, स्वायत्त (ऑटोनॉमस), डीम्ड् युनिव्हर्सिटीजमध्ये इंटिरिअर डिझायनिंगचे अनेक कोर्सेस विविध स्तरावर उपलब्ध आहेत. कोणत्याही शाखेतून बारावी केल्यावर तुम्हाला बॅचलर इन फाइन आर्ट्स हा कोर्स करता येतो. या कोर्समध्ये तुम्ही इंटिरिअर डिझायनिंगमध्ये स्पेशलायझेशन करू शकता. या कोर्सला प्रवेश घेण्यासाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागते. बारावी किंवा ग्रॅज्युएशननंतर डिप्लोमा किंवा सर्टिफिकेट कोर्स करण्याचा मार्गही आहे. बॅचलर इन आर्किटेक्चर कोर्समध्ये इंटिरिअर डिझायनिंग या विषयात स्पेशलायझेशन करण्याचा पर्याय आहे. इंटिरिअर डिझायनिंग कोर्सच्या अभ्यासक्रमात ड्रॉइंग, जागेचे (स्पेस) नियोजन, फर्निचर डिझाइन, परस्पेक्टिव्ह (सपाट अथवा सखल पृष्ठभागावर वस्तू कशा ठेवायच्या याचा अभ्यास), रंग आणि कपडे, कार्यपद्धतींचा अभ्यास आदी विषयांचा समावेश केलेला असतो. आजचा जमाना कम्प्युटराइज्ड् झालेला आहे. त्यामुळे हे कौशल्य तुम्हीसुद्धा शिकून घ्यायला हवं. विविध सॉफ्टवेअर्सच्या मदतीने ड्रॉइंग्ज/डिझाइन्स आणि प्लॅन काढता येतील.

### नोकरीच्या संधी

इंटिरिअर डिझायनर्स केवळ घरं सजवण्याचे काम करतात असं नाही, तर विविध कार्यक्षेत्रांमधील ऑफिसेस, हॉस्पिटल्स, शॉपिंग सेंटर्स, डिपार्टमेंटल स्टोअर्स, स्पेशालिटी स्टोअर्स, हॉटेल्स आणि रेस्तराँ, क्लिनिक्स, लॅब्ज आदी अनेक जागा आकर्षक व योग्य पद्धतीने सजवण्याची जबाबदारी इंटिरिअर डिझायनरवर असते. इंटिरिअर डिझायनिंगचं काम करताना एक व्यावसायिक म्हणून तुम्हाला विविध प्रकारची कामे पार पाडावी लागतात. जसं की फर्निचरची डिझाइन्स, प्रदर्शनाचं डिझाइन, आर्किटेक्चर फर्ममधील रिटेल डिझाइन, रिॲलिटी कंपन्या आदी. भिंतींना कोणता रंग द्यायचा इथपासून प्रकाशयोजना (लाइट्स ॲरेंजमेंट), एसीची जागा, फायर सेफ्टी आदी अनेक कामे करावी लागतात. या क्षेत्रात यशस्वी व्हायचं तर तुमच्याकडे कल्पकता, विचार करण्याची क्षमता, व्हिज्युअलायझेशन पॉवर, निरीक्षण शक्ती आणि विश्लेषण करण्याची क्षमता आदी गुण असायला हवेत. त्याचबरोबर व्यवस्थापकीय (मॅनेजमेंट) आणि प्रशासकीय (ॲडमिनिस्ट्रेटिव्ह) कौशल्य तुमच्याकडे असल्यास ते अधिक फायद्याचं ठरू शकतं. कोणत्याही ग्राहकाशी बोलताना त्याचं म्हणणं ऐकून घेण्याची तुमची तयारी असायला हवी. कम्प्युटरचं सॉफ्टवेअरविषयी अप टू डेट ज्ञान तुमच्याकडे असायला हवं. कम्प्युटरवर काम करताना मेहनत थोडी कमी करावी लागेल तसंच, काम जलदरीत्या होईल.



## शॉर्ट न्यूज

### कोपरगावात सकल हिंदू समाजाचा मोर्चा

**कोपरगाव :** समाजात तेढ निर्माण करणाऱ्यावर तडीपारची कारवाई करण्याची मागणी येथील सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. सकाळी मोर्चा काढुन याबाबत तहसीलदार व शहर पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले. यावेळी शहरातून निघालेल्या या मोर्चाने माजी नगराध्यक्ष विजय वहाडणे, दत्ता पुंडे, विमल पुंडे, श्रीरामपूरचे सागर बेग, कलविंदरसिंग दरियाल, संतोष गंगवाल, अमित जैन, सुशात खैरे, दत्ता काले, योगेश वाणी, गणेश शिंदे आदींच्या शिष्टमंडळाने प्रशासनाला निवेदन दिले. यावेळी शेकडो समाज बांधव सहभागी झाले होते.

### वैष्णव आडकरने पटकावले रौप्यपदक

**पाथर्डी :** येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचा कुस्तीपटू वैष्णव आडकर याने चेन्नई येथे सुरु असलेल्या खेलो इंडिया स्पर्धेत रौप्यपदक पटकावले. ६७ किलो वजनगटात ग्रीको रोमन प्रकारात त्याने हे यश मिळविले. खेलो इंडिया स्पर्धेत कुस्ती क्रीडाप्रकारात यश मिळविणारा वैष्णव हा महाविद्यालयाचा पहिला खेळाडू ठरला आहे. बाबूजी आव्हाड महाविद्यालयाचे विद्यार्थी विविध क्रीडा प्रकारात बाजी मारत असून आडकर यांच्या रूपाने पुन्हा एकदा आव्हाड महाविद्यालयाचे नाव क्रीडा क्षेत्रात उंचावले आहे.

### गाडीचा विद्युत तारेशी संपर्कात चालकाचा मृत्यू

**राहुरी :** ऊस वाहतूक करणाऱ्या गाडीचा विद्युत तारेशी संपर्क आल्यामुळे चालक संतोष राणू मोटे यांचा मृत्यू झाला. तालुक्यातील खांबा वरवंडी शिवरात ही घटना घडली. राहुरी तालुक्यातील म्हैसगाव येथून संगमनेर कारखान्याला ऊस घेऊन येणाऱ्या या गाडीचा विद्युत तारेशी संपर्क आल्यामुळे अचानक गाडीने पेट घेतला. गाडीमध्ये विद्युत प्रवाह उतरल्यामुळे चालक मृत्युमुखी पडला. स्थानिक रहिवाशांच्या मदतीने विद्युत पुरवठा बंद करत गाडीला लागलेली आग विझवण्यात आली. घटनेची माहिती आश्वी पोलीस ठाण्यात देण्यात आली.

### शरणपूर वृद्धाश्रमासाठी गृहोपयोगी वस्तू भेटू

**नेवासा :** तालुक्यातील बँक ऑफ बडोदा सलाबतपूर शाखेच्या वतीने नेवासा खडका रोडवर असलेल्या शरणपूर वृद्धाश्रमासाठी गृहोपयोगी वस्तू भेट दिल्या. यावेळी सर्व अधिकाऱ्यांच्या हस्ते सदरच्या गृहपयोगी वस्तू वृद्धाश्रम चालकाकडे सुपूर्त करण्यात आल्या. शरणपूर वृद्धाश्रम प्रांगणात झालेल्या कार्यक्रम प्रसंगी सलाबतपूर शाखेचे शाखा व्यवस्थापक संतोष खांडीझोडे हे होते तर बँकेचे कृषी अधिकारी राजेश मोरे, अमोल लोखंडे वृद्धाश्रमाचे संस्थापक रावसाहेब मगर, कमिटीचे अध्यक्ष पत्रकार बाळासाहेब देवखिळे हे उपस्थित होते.

### विकास कामांसाठी निधी कमी पडू देणार नाही

**शेवगाव :** राज्य सरकारच्या गेल्या काही दिवसांतील सत्तेमधून काही विकासाची कामे करता आली. त्यापूर्वी कोरोनामुळे अडचणी आल्या होत्या. राज्यात सरकारही आपले नव्हते. विकासाला निधी देण्याचे काम केंद्र व राज्य सरकारने केले आहे. राहिलेली कामे करण्यासाठी आम्ही निधी देण्याचे काम करू असे प्रतिपादन खासदार डॉ. सुजय विखे यांनी केले. मोहोजदेवढे येथे विकासकामांचे उद्घाटन व साखर, दाळ वाटप कार्यक्रमात विखे बोलत होते. या वेळी आमदार मोनिका राजळे यांची उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी दिनकरकाका देवढे होते.

# पुणे जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकपदी पंकज देशमुख!

## ■ अमितेशकुमार पुण्याचे पोलीस आयुक्त ■ लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बदल्या



**शिरूर : प्रतिनिधी**

**पुणे जिल्ह्याचे नवीन पोलिस अधीक्षक म्हणून पंकज देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पोलिस अधीक्षक अंकीत गोयल यांची पदोन्नतीने गडचिरोली परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अतिरिक्त पोलिस अधीक्षक मितेश घट्टे व आनंद भोईटे या दोघांचीही पोलिस उपायुक्त बृहमुंबई येथे बदली करण्यात आली आहे.**

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या होणार होत्या. बुधवारी (दि. ३१) शासनाने अध्यादेश जारी करत या बदल्यांवर शिक्कामोर्तब केले.


लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश पारित केले, त्यात गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस अधीक्षक असलेले पंकज देशमुख आता पुणे जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक म्हणून कार्यभार स्विकारणार आहेत. नागरी संरक्षण व गृहरक्षक दलाचे अतिरिक्त नियंत्रक संजय जाधव बारामती विभागाचे नवीन अतिरिक्त पोलिस अधीक्षक म्हणून कार्यभार स्विकारणार आहेत. चाळीसगावचे अतिरिक्त पोलिस अधीक्षक रूपेश चोपडे पुणे विभागाचे अतिरिक्त पोलिस अधीक्षक पदाच्या कार्यभार स्विकारतील.

त्याबरोबरच अमितेश कुमार हे पुण्याचे नवीन पोलीस आयुक्त झाले आहे. सप्टेंबर २०२० रोजी अमितेश कुमार यांची नागपूर पोलीस आयुक्त म्हणून निवड करण्यात आली होती. नागपूरच्या इतिहासात सर्वाधिक काळ पोलीस आयुक्तपदी राहण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. १९९५ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी अमितेश कुमार यांनी औरंगाबाद शहराचे पोलिस आयुक्त म्हणून आणि मुंबई वाहतूक पोलिस शाखेचे सहआयुक्त म्हणून काम केले आहे. नागपूर पोलीस आयुक्त होण्याआधी अमितेश कुमार हे राज्य गुप्तवार्ता विभागात सहआयुक्त म्हणून कार्यरत होते.

# मास्टरमाईंड गणेश मारणेसह तिघांना अटक

## ■ पुणे पोलिसांची कारवाई ■ शरद मोहोळ हत्याकांड प्रकरण

**पुणे : प्रतिनिधी**



**कुख्यात गुंड शरद मोहोळ खून प्रकरणाचा मुख्य सूत्रधार गणेश मारणेला अटक करण्यात पुणे पोलिसांना अखेर यश आले आहे. मोहोळच्या खुनानंतर पसार झालेल्या मारणेला बुधवारी सायंकाळी संगमनेर परिसरातून गुन्हे शाखेने ताब्यात घेतले.**

शरद मोहोळवर ५ जानेवारी रोजी कोथरुडमधील सुतारदरा परिसरात पिस्तुलातून गोळीबार करून त्याचा खून करण्यात आला. त्यामुळे पुण्यासह राज्यभरात मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणात अन्य मुख्य सूत्रधार विठ्ठल शेलार, साहिल उर्फ मुन्ना पोळेकर याच्यासह १६ जणांना अटक करण्यात आली होती. मोहोळवर गोळ्या झाडल्यावर हल्लेखोरांनी आम्ही गणेश मारणे टोळीतील आहोत, असा आरडाओरडा केला होता, असे तक्रारीत नमूद आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासातही विठ्ठल शेलार आणि गणेश मारणे यांनी कट रचून मोहोळचा खून केल्याचे समोर आले होते. त्यामुळे मारणे पसार झाला होता. पोलिसांची विविध पथके राज्यभरात त्याचा शोध घेत होती.

दरम्यान, मारणे याने या प्रकरणात अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी न्यायालयात अर्ज केला होता. मारणे याच्या अटकपूर्व जामीन अर्जावर सरकार पक्षाला बाजू मांडण्याचे आदेश न्यायालयाने नुकतेच दिले आहेत. याशिवाय मारणे आणि शेलारसह सर्व आरोपींवर नुकताच महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यान्वये (मकोका) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**गणेश मारणेसह तिघे ताब्यात**

गणेश मारणे पसार झाल्यानंतर गुन्हे शाखेची पथके त्याच्या मागावर होते. संगमनेर परिसरातून बुधवारी सायंकाळी मारणेसह तिघांना गुन्हे शाखेने ताब्यात घेतले. गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलिस आयुक्त रामनाथ पोकळे, उपायुक्त अमोल झेंडे, सहायक आयुक्त सुनील तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली.

# आठरे पब्लिक स्कूलमध्ये फनलॅन्ड कार्निवलची धुम!

## नगरकरांनी घेतला खाद्यपदार्थांचा आस्वाद



**नगर : प्रतिनिधी**

**शहराच्या सावेडी विभागातील आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या विस्तीर्ण प्रांगणात फनलॅन्ड कार्निवल कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसिध्द उद्योगपती रवी बक्षी यांच्या शुभहस्ते करण्यात आले.यावेळी चंद्रभान आठरे पाटील ग्राम नवोदय ट्रस्टचे अध्यक्ष डॉ.अनिल आठरे पाटील,विश्वस्त डॉ. अंजली आठरे पाटील, डॉ. आदिती आठरे पाटील, मानसिंग आठरे पाटील व संजय आठरे पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.**

रवी बक्षी यावेळी बोलताना म्हणाले विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तिमत्व विकास, व्यवहार ज्ञान, संभाषण चातुर्य विकसित करण्याबरोबरच त्यांना आर्थिक देवाण-घेवाण शिकण्यासाठी फनलैंड कार्निवल कार्यक्रम उपयुक्त ठरेल असे कार्यक्रम विविध ठिकाणी होणे गरजेचे आहे आपण आता महानगरात राहतो,पुणे, मुंबई येथे होणारे असे कार्यक्रम नगरमध्ये पण झाले पाहिजे असेही ते म्हणाले

या कार्यक्रमामध्ये नृत्य, संगीत,अश्वरोहन, जलतरण,बलून शुटिंग,ट्रॅम्पोलिन,आर्चरी,वॉटर झॉरबिंग,बंजी जंम्पिंग,ॲन्ग्री बर्ड,क्षिल ऑफ फॉर्च्यून,बोट रेसिंग,बॉल इन क्लाऊन,डिस्क ड्रॉप,अंडर ओव्हर लकी सेव्हन,मैजिक शो,पपेट शो,बॉल फायडिंग,बंगी रन,बुल राईड,अरांऊड व वलर्ड,मेरी गो रांऊड,डि.जे.कॉर्नर,एलिमीनेटर,पेंट बॉल,बॉऊसिंग कॅस्टल या सारखे अनेक मनोरंजनात्मक खेळांचा आनंद घेण्याची सुवर्णसंधी मिळाली आहेः याशिवाय स्वादिस्ट व रुचकर व्हेज व नॉन व्हेज खाद्य पदार्थाचे स्टॉलही, नामांकित विक्रेत्यांकडून लावण्यात आले होते.त्याचाही मनमुराद आनंद घेऊन नगरकरांनी फुल टू, धमाल मस्ती करण्यासाठी आहे असे संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठरे पाटील म्हणाले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका कु.स्नेहल वाघमारे, व सौ.प्रीती क्षीरसागर यांनी केले. यावेळी पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाचकांच्या लेखणीतून

# संत समजण्यासाठी ग्रंथ वाचावेत



मी राहतो त्या परिसरात एका फलकावर जाहिरात लागली होती. संत रोहिदास यांच्या पुण्यतिथीनिमित्त अमुक अमुक हॉलमध्ये तमुक तमुक वेळेला कार्यक्रम होणार आहे. तेव्हा आपल्या समाजाच्या सर्व बंधुभगिनींनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे,अशी ती जाहिरात होती. ठरल्या दिवशी ठरल्या वेळेला मीही त्या कार्यक्रमाला हजर झालो. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे मी काही या समाजातला नाही. मी या कार्यक्रमासाठी येथे बसू शकतो काय, असेही मी आयोजकांना विचारले. त्यांची काहीच हरकत नव्हती. प्रमुख वक्त्यांची भाषणे झाल्यावर मीही दोन शब्द भाषण करू का, असे आयोजकांना विचारून परवानगी मिळवली. संत रोहिदासांचे जीवन आणि कार्य यावर मी थोडक्यात बोललो. पुढे म्हणालो, संत सगळ्या समाजाचे असतात. त्यांना आपण जातिजमातींच्या खुराड्यांमध्ये बंद करून ठेवणे त्यांच्या उपदेशाविरुध्द आहे.

बेळगावला १९६९ साली बौध्द साहित्य संमेलन भरले होते. अध्यक्षस्थानावरून बोलताना रतनलाल सोनाग्रा म्हणाले होते, ''संतांनी जातीभेद मोडण्याचा प्रयत्न केला; पण भक्तांनी आपापला संत उचलून घेतला. शिंप्यांनी नामदेव घेतला. सोनारांनी नरहरी उचलला. माळ्यांनी सावता माळ्याला भाजी मळ्यात बसवला.''

असा समाज स्वतःच जर समाजाच्या मुख्य प्रवाहापासून फटकून राहू लागला तर ते त्यांच्याच जीवनविकासाला रोधक आणि बाधक आहे.

**उनके कूचे से इक शाम गुजरा था मैं।**
**फिर यही रोज़ का मश्ग़ला बन गया।।**

माहिरूल क़ादरी हे उर्दू शायर म्हणतात, तिच्या गल्लीतून मी एकदा सहज म्हणून फेरफटका मारला. मग पुढे ही माझी दिनचर्याच झाली! म्हणून आपण संत समजण्यासाठी आधी ग्रंथ वाचले पाहिजेत.

**नाना ढवळे**
**८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

## वाचकांच्या लेखणीतून

# पुरस्काराचा सन्मान!



नाटक, चित्रपट , मालिका या माध्यमातून अभिनय कसा असतो, तो कसा करतात, अभिनय म्हणजे काय याचे उत्तर अनेक जण आपापल्या परीने देतीलही पण एका वाक्यात सांगायचं झालं तर अभिनय म्हणजे अशोक सराफ. ज्याला अतिरेकी अभिनय आणि अभिनय, संवाद यांची लक्ष्मण रेषा पुरेपूर ठाऊक आहे असा अभिनेता. सहज सुंदर अभिनयातून गेले अनेक वर्ष रसिकांच्या चेहऱ्यावर हासू तर क्षणात लिलया आसू आणणारे नटसम्राट अशोकजी सराफ सरांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला हे ऐकून आनंद वाटला. भविष्यातही विविध माध्यमातून त्यांच्या अभिनयाचे विविध कंगोरे असेच चिरंतर पाहण्याचे भाग्य आम्हा रसिकांना लाभत राहावेत.

**विश्वनाथ पंडित, ९५८८४५०४४२**

# शिवकाव्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी साहित्यिक रज्जाकभाई शेख यांची निवड

## शिवजयंतीनिमित्त निमगाव वाघात संमेलन




**श्रीरामपूर : प्रतिनिधी**

**महाराष्ट्राचे कुलदैवत छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त निमगाव वाघा येथील परिवार मंगल कार्यालयात शिवकाव्यसंमेलन व शाहिरी जलसेचे आयोजन केले आहे.महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक गजलकार रज्जाकभाई शेख यांची संमेलन अध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड केल्याचे पत्र कै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था ,नवनाथ युवा मंडळ,आणि धर्मवीर सार्वजनिक वाचनालय निमगाव वाघा जिल्हा अहमदनगर यांच्यावतीने अध्यक्ष पैलवान नानाभाऊ डोंगरे यांनी दिले.**

या कविसंमेलनात राज्यभरातील नामांकित कवि,कवयित्री यांची हजेरी लागणार आहे. तसेच शिवचरित्र गाणारी शाहीर मंडळी शिवशाहीरी जलसा सादर करणार आहे.यावेळी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक व पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामीण साहित्यिक रज्जाकभाई शेख यांनी विविध राज्यस्तरीय संमेलनात आपल्या कवितेचे उत्तम सादरीकरण करून रसिकांची मने जिंकली आहेत. त्यांच्या दीड हजारापेक्षा जास्त कविता विविध वृत्तपत्र, मासिके व दिवाळी विशेषांक यांत प्रकाशित झालेल्या आहेत. मनातील भावनांना शब्दबद्ध करून कविता ,कथा लेख, यांचे लेखन तसेच हास्यकविता, लेख, हायकू, अभंग, प्रेमकविता, गझल, काव्यांजली,अष्टक्षरी, गजल आदी काव्यप्रकारात लेखन केले आहे.

उस्मानाबाद,नाशिक,वर्धा,आखिल भारतीय मुस्लिम साहित्य संमेलन पुणे, येथे त्यांच्या कवितांची निवड झाली आहे.शिरूर येथील राज्यस्तरीय कविसंमेलन,कन्नडचे तिफण संमेलन, श्रीरामपूर येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे संमेलन,नेवासा येथील शिवस्वराज्य काव्यसंमेलन तसेच औरंगाबाद येथील बोधी ट्री एज्युकेशन संस्थेच्या कविसंमेलनाचे ते माजी कवीसंमेलनाध्यक्ष आहेत.

निवडपत्र देताना संस्थेचे अध्यक्ष पैलवान नानाभाऊ डोंगरे, ग्रामीण कवी आनंदा साळवे,आदर्श शिक्षक देविदास बुधवंत, संजय वाघमारे, आत्माराम शेवाळे,बाळासाहेब कोठुळे, गोरखनाथ पवार,चंद्रकांत परदेशी, प्रसाद काळे, प्रशांत शिंदे आदी मान्यवर कवी उपस्थित होते.

# खेळाने अपयश पचविण्याचे गुण विकसीत होतात - छायाताई फिरोदिया

## अशोकभाऊ फिरोदिया स्कूल मध्ये रंगला मैदानी स्पर्धेचा थरार । क्रीडा मेळावा उत्साहात

**नगर : प्रतिनिधी**

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये क्रीडा मेळावा उत्साहात पार पडला. शाळेत विविध मैदानी स्पर्धेचा थरार रंगला होता. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या खेळातील कौशल्याचे प्रदर्शन घडविले.

संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, सहकार्यवाह गौरव फिरोदिया व खजिनदार प्रकाश गांधी यांनी खेळाडूंना शुभेच्छा देऊन क्रीडा मेळाव्याचे प्रारंभ झाले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक प्रभाकर भाबड, विभाग प्रमुख रेखा शर्मा, वैशाली वाघ, क्रीडा शिक्षक प्रितम जाधव, आकाश थोरात, हेड बॉय रोहन अडसरे, हेड गर्ल सिध्दी मते आदींसह सर्व शालेय शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



छायाताई फिरोदिया म्हणाल्या की, जीवनात मैदानी खेळ आनंद निर्माण करतो. तर खेळाने अपयश पचविण्याचे व संयमाने पुढे जाण्याचे गुण विकसीत होतात. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये दिवसेंदिवस मैदानी खेळाचे महत्त्व कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणाबरोबरच खेळाकडे वळण्याचे त्यांनी आवाहन केले. प्रभाकर भाबड म्हणाले की, क्रीडा स्पर्धेतून करिअर करण्याच्या विविध संधी उपलब्ध आहेत. शासकीय नोकरीसाठी खेळाडूंना जागा राखीव आहेत. बाल वयातच खेळाची गोडी निर्माण झाल्यास त्याचे आरोग्य सदृढ व निरोगी राहण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शाळेच्या मैदानावर गोला फेक, थाळी फेक, लांब उडी, १००, २०० मीटर धावणे, चेंडू फेक, ४०० बाय १०० मीटर रिले या स्पर्धा रंगल्या होत्या. मैदानावर विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धांचे अटीतटीचे थरारक क्षण अनुभवले. तर मैदानी खेळाचा आनंद लुटला.

धावणे स्पर्धेचे विशाल गोहेर, विद्या यादम, शैलेश राशीनकर, सुजित लांडे, लांब उडी स्पर्धेचे आसिफ शेख, संदीप गोरे, गोळा फेक स्पर्धेचे मनिष कांबळे, वैदेही गायकवाड, थाळी फेकचे रुबिना शेख, रविंद्र उजागरे यांनी परीक्षण केले. प्रमुख पंच म्हणून प्रितम जाधव व आकाश थोरात यांनी काम पाहिले.

(पान १ वरून)

### शिरुर रांजणगांव पोलीस ठाण्याला नवे कारभारी !

आली आहे. मंगळवेढा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक म्हणून ज्योतीराम गुंजवटे यांनी यापूर्वी काम पाहीले आहे. मंगळवेढा पोलिस ठाण्यामध्ये कोरोना काळात दोन वर्षे सक्षमपणे काम केले. चांगल्या पध्दतीने कायदा, सुव्यवस्था सांभाळली आहे. करमाळा पोलीस ठाण्यात ही गुंजवटे यांनी पोलीस निरीक्षक म्हणून काम केले आहे. तसेच शिरूर पोलीस ठाण्यात ते यापूर्वी पोलीस उपनिरीक्षक म्हणून ही कार्यरत होते.

श्री वाघमोडे यांनी यापूर्वी इचलकरंजी पोलीस ठाण्यात तसेच आणि कोल्हापूर गुन्हे अन्वेषण विभागात पोलीस निरीक्षक म्हणून काम पाहिले आहे. अनेक गंभीर गुन्हे उघडकीस आणण्याचे काम त्यांनी त्या ठिकाणी केले आहे. एक डॅशिंग अधिकारी म्हणून त्यांची त्या ठिकाणी प्रतिमा होती. आता रांजणगाव औद्योगिक वसाहतीतील गुंडगिरी रोखण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर असणार आहे.

# अनुभव हाच आपला गुरू, त्याचा सकारात्मक वापर करा

■ कवी, लेखक गीतकार इंद्रजित भालेराव यांचा सल्ला
■ पारनेर महाविद्यालयाचे वार्षिक पारितोषिक वितरण




■ पारनेर महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात कवी, लेखक गीतकार इंद्रजित भालेराव यांनी मार्गदर्शन केले.

**पारनेर : प्रतिनिधी**

**अनुभव हाच आपला गुरू असून त्याचा जीवनात सकारात्मक वापर केल्यास यश ठरलेले असते असा विश्वास ज्येष्ठ कवी, लेखक व गीतकार इंद्रजित भालेराव यांनी व्यक्त केला.**

पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्य कॉलेजच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून भालेराव हे बोलत होते. जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या विश्वस्त ॲड. दिपलक्ष्मी म्हसे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

यावेळी आपल्या जीवनातील अनुभव कथन करताना भालेराव म्हणाले, आपल्याला आलेले अनुभव हेच आपले गुरू असून याच अनुभवाच्या जोरावर मला कविता व लेखन करता आले. दहावी नापास असूनही केवळ वर्षभर गुरे राखली या अनुभवातून मला शेतकऱ्यांचे दुःख कळाले व त्यातून शेतकऱ्यांच्या जीवनावर पाचशेच्या वर कविता करता आल्या. विद्यार्थ्यांनी खचून न जाता आपल्या जीवनातील अनुभवांचा सकारात्मक उपयोग करण्याचे आवाहन त्यांनी केले.यावेळी विविध क्षेत्रांत यश संपादन केलेल्या विद्यार्थी, प्राध्यापक यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी शिवशाहीर कल्याण काळे, निर्मलाताई काटे, प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, कार्यक्रमाचे कार्याध्यक्ष प्रा. भिमराज काकडे, समन्वयक डॉ. तुकाराम थोपटे, सावकार काकडे, संजय कोल्हे, प्रा. गंगाराम खोडदे, प्रा. संजय गायकवाड, प्रा. रविंद्र देशमुख, विद्यार्थी प्रतिनिधी शुभांगी जाधव हे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. मतकर यांनी प्रास्ताविक, अशोक शिंदे, हरेश शेळके, माया लहारे यांनी सुत्रसंचलन तर डॉ. अनिल आठरे यांनी आभार मानले.

**कवितेचा सन्मान**

**माझी कविता मुख्यमंत्र्यांनी विधीमंडळाच्या अधिवेशनात मांडली. तिच कविता पाडयावर लग्न समारंभात मांडली जाते हाच माझ्यासारख्या कवीचा व माझ्या कवितेचा खरा सन्मान आहे.**

**इंद्रजित भालेराव**
कवी, लेखक गीतकार

**पारनेर महाविद्यालय हे विद्यापीठातील एक आदर्श महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाने अनेक नामवंत विद्यार्थी घडविले असून त्यामुळेच या महाविद्यालयास ए प्लस प्लस हे मानांकन मिळाले आहे. जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेने १०५ वर्षाच्या शतकमहोत्सवी कालखंडात शिक्षण क्षेत्रात ठसा उमटविला आहे.**

**दीपलक्ष्मी म्हसे**
विश्वस्त

# डाळ व साखरेमुळे विरोधकांना पोटशुळ !

राहुल शिंदे पाटील यांचे प्रत्युत्तर



■ लोणीमावळा ते देवीभोयरे व बाभुळवाडे या रस्त्यांच्या कामाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. (छाया : संदीप ईधाटे)

**निघोज : प्रतिनिधी**

**डाळ आणि साखर गोरगरीबांना मिळते आहे म्हणून विरोधकांना पोटशुळ उठला असून त्याचे उत्तर मतदार लोकसभा निवडणूकीत निश्चित देतील असा विश्वास भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील यांनी व्यक्त केला.**

लोणीमावळा ते देवीभोयरे व लोणीमावळा ते बाभुळवाडे या रस्त्यांच्या कामाचा शुभारंभ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. संदीप वराळ जनसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन वराळ पाटील हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

शिंदे म्हणाले, आम्ही दहा, वीस लाखांच्या कामांची भुमिपुजने करतो मात्र तालुक्यातील हाच आकडा कोटींमध्ये आहे. आमची विकास कामे सातत्याने सुरू आहेत. आकडे जाहिर करायचे काम मात्र प्रत्यक्षात साडेचार वर्षांनी हा आमचा विषय नाही असे सांगत शिंदे यांनी आ. नीलेश लंके यांना अप्रत्यक्ष टोला लगावला.

सर्वसामान्य जनतेची काळजी पालकमंत्री राधाकृष्ण विखे व खा. डॉ. सुजय विखे हे घेतात याचाही विरोधकांना पोटशुळ उठला असून त्याचे उत्तर मतदार लोकसभा निवडणूकीत देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संग्राम पावडे यांनी सुत्रसंचलन तर माजी सरपंच अशोक मावळे यांनी आभार मानले.

यावेळी राहुल विखे, लहू भालेकर, भाऊसाहेब डेरे, मोहन कामठे, स्वप्निल मावळे, डॉ. सुभाष मावळे, संतोष शेंडकर, विलास शेंडकर, कैलास गोरडे, महेश कोल्हे, वंदना मावळे, नुरा पठाण, भाऊशेठ लाळगे, गणेश शेंडकर, हसन पठाण, पोपट तुपे, बाबा कामठे, शिवाजी तुपे, पोपट लाळगे, प्रकाश शेंडकर, बन्सी लाळगे, भिमाजी लाळगे, चंद्रकांत शेंडकर, सागर पडवळ, पिराजी तुपे, देवराज शेंडकर, सुभाष मावळे, रामभाऊ मावळे, विठ्ठल मावळे, शशिकांत मावळे, अनिल लाळगे आदी उपस्थित होते.

# आनंदसिंधू वृध्दाश्रमात उबदार कपडे, फराळाचे वाटप

इंजि. सागर साळुंके यांच्या वाढदिवसाचे औचित्य




■ इंजि. सागर साळुंके यांच्या वाढदिवसानिमित्त आनंदसिंधू वृध्दाश्रमात उबदार कपडे व फराळाचे वितरण करण्यात आले.

**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**वासुंदे येथील सॉफ्टवेअर इंजिनिअर सागर साळुंके यांनी आपल्या वाढदिवसाला होणारा अनावश्यक खर्च टाळून टाकळी ढोकेश्वर येथील आनंदसिंधू वृध्दाश्रमात उबदार कपडे व फराळाचे वितरण करीत सामाजिक बांधीलकी जोपासली.**

पुण्यातील नामांकित आयटी कंपनीमध्ये वरिष्ठ पदावर काम करीत असलेले सागर हे शांत व संयमी व्यक्तीमत्व असून वासुंदे व परिसरातील सामाजिक उपक्रमात त्यांचा नेहमीच सहभाग असतो. आनंदसिंधू वृध्दाश्रमामध्ये उबदार कपडे व फराळाचे वितरण करून साजरा करण्यात आलेल्या या वाढदिवसाप्रसंगी वृध्दाश्रमाचे संचालक ह भ प विलास महाराज लोंढे, उद्योजक दत्तात्रय साळुंके, इंजि. प्रसाद झावरे, दत्ता जगदाळे, सुमित औटी, शुभम गुंदेचा, युवराज उमाप, किरण झोंबाडे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना उद्योजक दत्तात्रय साळुंके यांनी सांगितले की, आजची युवा पिढी वाढदिवसानिमित्त मोठया प्रमाणावर अनावश्यक खर्च करते. या अनावश्यक खर्चाला फाटा देत आमचे सहकारी इंजि. सागर साळुंके यांनी वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी टाकळीढोकश्वर येथील लोंढे महाराजांच्या आनंदसिंधू वृध्दाश्रमातील माता, भगिनींसाठी सध्याच्या थंडीच्या दिवसात आवष्यक असलेले उबदार कपडे तसेच फराळाचे वितरण केले. फुल ना फुलाची पाकळी म्हणून इंजि. सागर साळुंके यांनी राबविलेला उपक्रम कौतुकास्पद आहे. असेच उपक्रम यापुढील काळातही राबविले जावेत. समाजातील अनेक युवकांनी सागर यांचा आदर्श घेऊन अशा उपक्रमांमधून समाजामध्ये एक सामाजिक संदेश निर्माण व्हावा अशी अपेक्षा दत्तात्रेय साळुंके यांनी व्यक्त केली.

# आठवडे बाजारात मोबाईल चोर रंगेहात पकडले

■ सुप्याच्या बाजारातील घटना ■ सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**सुपा : प्रतिनिधी**

**सुपा येथे दर बुधवारी भरणाऱ्या आठवडे बाजारात मोबाईल चोरून पसार होणारे दोघे तरूण नागरीकांनी ३१ जानेवारी रोजी रंगेहात पकडले. त्यांना पोलीसांच्या हवाली करण्यात आल्यानंतर त्यांच्याविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

सुपा ही परिसरातील वीस तेच बावीस गावांची बाजारपेठ असून औद्यागिकरणामुळे सुप्याचे नागरीकरण झपाटयाने वाढत आहे. अशातच वाढत्या गर्दीचा फायदा घेत मोबाईल चोरीच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. सायंकाळी कंपन्यांची कामगार सुटल्यानंतर बाजारपेठेत मोठी गर्दी होते. गर्दीचा फायदा घेत मोबाईलचोर खिशातील मोबाईल अलगद काढून घेत परागंदा होतात. बुधवार दि.३१ रोजी असेच दोघे भामटे नागरीकांच्या सतर्कतेमुळे पकडले गेले.

यासंदर्भात सुपा पोलीस ठाण्याकडून मिळालेल्या माहितीनुसार सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास कंपनी




कामगार सुटल्यानंतर झालेल्या गर्दीचा फायदा घेत दोघा चोरटयांनी आठवडे बाजारात बाजार करीत असलेले बापू बाजीराव झांबरे वय ४५ रा. दैठणे गुंजाळ यांच्या खिशातील मोबाईल काढून घेत पळ काढला. झांबरे यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी आरडा ओरडा केल्यानंतर बाजारातील इतर नागरीकांनी पाठलाग करून दोघांनाही ताब्यात घेतले व पोलीसांच्या हवाली केले.

मोबाईल चोरून पसार होऊ पाहणारे अभिषेक अशोक जोगारे वय २९ व करण शिवाजी वाघमारे वय १६ दोघेही रा. राजीवनगर, जिल्हा बीड यांना पोलीसांच्या ताब्यात दिल्यानंतर बापू झांबरे यांच्या फिर्यादीवरून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. दोघांकडून आठ हजार रूपये किमतीचा ववो कंपनीचा मोबाईल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास सहा फौजदार पटेल हे करीत आहेत.

# संत निळोबाराय विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

रेखाकला परिक्षेचा निकाल जाहिर

**निघोज : प्रतिनिधी**

**पिंपळनेर येथील संत निळोबाराय विद्यालयाचा शासकीय रेखाकला परिक्षेचा निकाल शंभर टक्के लागला असून विद्यालयाने शंभर टक्के निकालाची परंपरा यंदाही कायम राखली आहे.**




ऑक्टोबर २०२३ मध्ये झालेल्या इंटरमिजिएट परिक्षेला विद्यालयातील एकूण १८ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी प्रज्ञा संजय रायकर, श्रध्दा संतोष रासकर, धनश्री ज्ञानदेव खामकर यांनी ए ग्रेड मिळविली तर प्रतिक पांडूरंग खामकर, गौरी राजेंद्र रासकर, अनुष्का दत्तात्रेय रासकर, गायत्री वसंत पोटे या विद्यार्थ्यांनी बी ग्रेड मिळवून ते उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रयत्न शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भास्करराव रासकर, सचिव सागर रासकर विद्यालयाचे मुख्याध्यापक रामराव पवार सर्व शिक्षक वृंद ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना कला शिक्षिका कलास्मृती वाळुंज यांनी मार्गदर्शन केले.

# मच्छिंद्रशेठ म्हस्के यांचे निधन

**निघोज : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील चोंभूत गावाचे ज्येष्ठ कारभारी व प्रसिध्द गाडा मालक मच्छिंद्रशेठ बाबुराव म्हस्के यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते.**



पारनेर तालुका कृषि उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक लक्ष्मणशेठ म्हस्के, मारूती म्हस्के, विलास म्हस्के यांचे कै. मच्छिंद्रशेठ हे बंधू, तुकाराम म्हस्के, गोरख म्हस्के, संतोष म्हस्के यांचे वडील तर चोंभूतचे विद्यमान सरपंच दत्तात्रेय मारूती म्हस्के यांचे चुलते होत.

# वेताळबाबाच्या धर्तीवर बाभुळवाडयात क्रीडांगण

ग्रामस्थांचा संकल्प; लोकवर्गणीला सुरुवात



■ ग्रामस्थांच्या लोकसहभागातून बाभुळवाडे येथे अद्यावत क्रीडांगण तयार करण्यात येत आहे. (छाया : संदीप इधाटे)

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथे लोकसहभागातून तयार करण्यात आलेल्या वेताळबाबा क्रिडांगणाच्या धर्तीवर बाभुळवाडे येथेही लोकसहभागातून क्रीडांगण तयार करण्याचा संकल्प बाभुळवाडे ग्रामस्थांनी केला आहे. आपलं गाव सामाजिक संस्थेच्या वतीने अध्यक्ष डॉ. सुरेश खणकर यांनी या कामासाठी ३० हजार रूपयांची देणगीही दिली आहे.**

निघोज येथे लोकसहभागातून अद्यावत क्रिडांगण साकारल्यानंतर त्याची चर्चा परिसरात सुरू आहे. असेच क्रीडांगण क्रीडा प्रेमींसाठी आपल्याही गावात हवे या भावेतून बाभुळवाडे ग्रामस्थांनी पुढाकर घेत युवक, ग्रामस्थ यांनी देणगी संकलनास प्रारंभ केला आहे. गावकरी तसेच पुण्या, मुंबईतील बाभुळवाडकर मंडळी देणगीच्या स्वरूपात या कामासाठी हातभार लावत आहेत.

क्रीडांगणाचा संकल्प केल्यानंतर श्री केदारेश्वर देवस्थानच्या पायथ्याला पोकलेन, जेसीबीच्या मदतीने गेल्या दहा दिवसांपासून कामास सुरूवात करण्यात आली आहे. पारनेरचे माजी नगराध्यक्ष विजय औटी यांनी त्यासाठी एक पोकलेन तसेच डिझेलची व्यवस्था केली आहे. मैदानाचे काम दहा दिवसांत ७० टक्के पुर्ण झाले असून आपलं गाव फाउंडेशनच्या वतीने या कामासाठी ३० हजार रूपयांचा धनादेश महेश साळवे, नीलेश कदम, वैभव इंगळे, संतोष खणकर, दिलीप जगदाळे, जुबेर पठाण, अप्पा दाते यांच्याकडे सुपूर्द केला.

अलिकडेच निघोज येथील वेताळबाबा क्रीडांगणाची बाभुळवाडे ग्रामस्थांनी पाहणी केली होती. वेताळबाबा क्रीडांगण सुशोभिकरण समितीचे अध्यक्ष कॅप्टन विठ्ठल वराळ, मेजर विकास वराळ, अमोल ठुबे, आजी माजी सैनिक संघटना, निघोज ग्रामस्थ, मुंबईकर मंडळ यांनी लोकसहभागातून अतिशय सुसज्ज क्रीडांगण तयार केले असून तोच आदर्श घेऊन बाभुळवाडे येथील क्रीडांगण साकारात आहे.

**तीन लाखांचा निधी**

**क्रीडांगणाच्या कामासाठी तीन लाख रूपयांचा निधी संकलीत झाला असून आजूनही देणगी संकलन सुरू आहे. सध्याची तरूणाई मोबाईलच्या विळख्यात सापडली असून तरूणाईला मोबाईलच्या विळख्यातून दुर करून त्यांची शारीरीक तंदुरूस्तीसाठी अद्यावत क्रिडांगण साकरण्यात येत आहे.**

# आवडीचे रूपांतर छंदामध्ये केल्यास यश निश्चित

■ प्रा. संदीप जाधव यांचे प्रतिपादन ■ पारनेर पब्लिकमध्ये व्यवसाय मार्गदर्शन




■ पारनेर पब्लिक स्कुल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स या शिक्षण संकुलाच्या वतीने व्यवसाय मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

**पारनेर : प्रतिनिधी**

**आपण आपल्या आवडीचे रूपांतर छंदामध्ये केले तर जीवनात यश संपादन करणे अधिक सोपे होते असे प्रतिपादन प्रा. संदीप जाधव यांनी केले.**

पारनेर पब्लिक स्कुल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या व्यवसाय मार्गदर्शन मेळाव्यात प्रा. जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षण संकुलाचे संस्थापक अध्यक्ष तथा प्राचार्य गिताराम म्हस्के, संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, अजिनाथ नांगरे, सविता कानवडे, नलिनी गायकवाड यांच्यासह विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. इयत्ता नववी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी या मेळाव्यात सहभाग घेतला.

या मेळाव्यात प्रा. जाधव यांनी दहावी, बारावीनंतरचे व्यवसायिक अभ्यासक्रम व उपलब्ध होणाऱ्या संधी याविषयी विद्यार्थ्यांना सखोल माहीती दिली. विद्यार्थ्यांच्या शंकांचेही त्यांनी निरसन केले.
प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी सांगितले की, शासनाने नवे शैक्षणिक धोरण तयार केले असून या धोरणामध्येही व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमांना प्राधान्य देण्यात आलेले आहे. माहीती व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये नव नवीन अभ्यासक्रमांच्या संधी उपलब्ध होत असून विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमांचीही निवड केली पाहिजे. राज्यातील उद्योगांच्या तसेच सेवा क्षेत्रातील व्यवसायांच्या गरजा पुर्ण करण्यासाठी व्यवसायीक अभ्यासक्रमांना प्राधान्य देण्यात येत असून त्यातून मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध होत असल्याचे म्हस्के म्हणाले.

**विविध उपक्रम**

**विद्यार्थ्यांच्या अवांतर ज्ञानासाठी शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमधील ज्ञान मिळावे यासाठी संस्थेकडून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. विविध संस्था तसेच शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परिक्षा तसेच विविध क्रीडा स्पर्धांमध्येही शिक्षण संकुलाचा सहभाग असतो.**

**गिताराम म्हस्के**
प्राचार्य
पारनेर पब्लिक स्कुल

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com